


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २१५ • सोमवार दि.२५ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## इंधनाच्या दरात सलग चौथ्यांदा वाढ




मुंबई/प्रतिनिधी-पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीचा भडका पुन्हा उडाला असून सोमवारी इंधनाच्या दरांमध्ये मोठी वाढ करण्यात आली. पेट्रोल प्रतिलिटर २ रुपये ६१ पैसे तर डिझेल २ रुपये ७१ पैसेने महागले आहे. इंधनदरात आजपर्यंत गेल्या बारा दिवसात एकूण साडेसात रुपयांची वाढ झाली आहे. या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

आखाती देशातील युद्धामुळे जगभरात इंधन टंचाई निर्माण झाली आहे. देशात पाच राज्यांच्या निवडणुकांचे निकाल हाती आल्यानंतर अवघ्या बारा दिवसात चौथ्यांदा दरवाढ करण्यात आली आहे. या दरवाढीनंतर राजधानी दिल्लीमध्ये पेट्रोलने प्रथमच शंभरी पार केली असून पेट्रोलचा दर १०२.१२ प्रति लिटरवर पोहोचला आहे. तर डिझेल ९५.२० प्रति लिटर झाले आहे. मुंबईमध्ये पेट्रोल १११.२१ तर डिझेल छ९७.८३ प्रति लिटर दराने विकले जात आहे. १५ मेपासून इंधनदरवाढीची मालिका सुरू झाली आहे. १५ मे रोजी प्रतिलिटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर १९ मे रोजी ९० पैशांची वाढ, तर २३ मे रोजी पेट्रोल ८७ पैशांची आणि डिझेल ९१ पैशांनी महागले होते. सोमवारी झालेल्या नव्या वाढीनंतर वाहनधारकांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.सरकारी तेल कँम्न्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे दरवाढ अपरिहार्य झाल्याचे म्हटले आहे. ओएनजीसीच्या संचालक सुषमा रावत यांनी एएनआयशी बोलताना, युद्धस्थिती कायम राहिल्यास इंधनदर आणखी वाढू शकतात, असा इशारा दिला.दरम्यान, इंधनदरवाढीचा परिणाम वाहतूक खर्चावर होण्याची शक्यता असून त्याचा थेट फटका महागाईवर बसणार असल्याचे आर्थिक तज्ज्ञांनी म्हटले आहे. सततच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून इंधन दरवाढीचे समर्थन

मुंबई/प्रतिनिधी-पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे राज्यातील नागरिकांमध्ये चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दरवाढीबाबत महत्त्वाची भूमिका मांडली आहे. इंधन दरवाढीमागे स्थानिक नव्हे तर जागतिक कारणे असल्याचे सांगत त्यांनी या वाढीचे समर्थन केले. तसेच कृत्रिम तुटवडा निर्माण करण्यासाठी इंधनाची साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

## खोल दरीत वाहन कोसळले; आठ जणांचा जागीच मृत्यू




महाबळेश्वर:रायगड जिल्ह्यातील आंबेनळी घाटात आज पहाटे भीषण अपघात होऊन आठ जणांचा जागीच मृत्यू झाला. सातारा जिल्ह्यातील आसगाव येथील तरुणांची स्कॉर्पिओ गाडी पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावरील धोकादायक वळणावरून थेट सुमारे १००० ते १५०० फूट खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त होत आहे.

माहितीनुसार, आसगाव येथील काही तरुण स्कॉर्पिओ गाडीतून प्रवास करत होते. आंबेनळी घाटातील तीव्र वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्या ठिकाणी मजबूत संरक्षक कठडे नसून केवळ मातीचा ढिगारा टाकण्यात आला होता. भरधाव वेगातील स्कॉर्पिओ थेट मातीवर चढून दरीत कोसळली. अपघात इतका भीषण होता की गाडीचा पूर्णपणे चक्काचूर झाला.अपघाताची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, पोलीस, एनडीआरएफ आणि स्वयंसेवी बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. दरी अत्यंत खोल पान ४ वर

## मराठवाड्यात वादळी पावसाची शक्यता

### तर विदर्भाला उष्णतेचा रेड अलर्ट

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील हवामानात गेल्या काही दिवसांपासून मोठे बदल होत असून, एका बाजूला विदर्भात उष्णतेची तीव्र लाट कायम आहे, तर दुसरीकडे मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाने विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी रेड आणि ऑरेंज अलर्ट जारी केला असून, मराठवाड्यातील काही भागांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

राज्यात मान्सूनचे लवकरच आगमन होणार असल्याचे सांगीतले जात असतांनाच अजुन मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावलेली नाही. परंतु पुढील काही दिवसात मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पाऊस तर विदर्भात तीव्र उष्णतेची लाट निर्माण होईल. असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विदर्भातील वर्धा, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४३ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडल्याने हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला आहे. तर नागपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पुढील काही दिवस उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. मराठवाड्यातील बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.मुंबईसह कोकण किनारपट्टी भागातही उकाड्याचा जोर कायम राहणार आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांमध्ये हवामान दमट व अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज असून, कमाल तापमान ३४ ते ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. गेल्या आठवडाभरापासून तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअसदरम्यान राहत असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांना प्रखर उन्हाचा मोठा फटका बसत असून, रस्त्यांवर दुपारच्या वेळी शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

## कोसमेट जवळ १७ लाख रुपयांचा गुटखा पोलीसांनी पकडला



नांदेड/प्रतिनिधी-तेलंगणातून वाहनाद्वारे नांदेड जिल्ह्यात गुटख्याची सर्रासपणे तस्करी सुरु आहे. किनवट तालुक्यातील कोसमेट जवळ स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी कारवाई करुन १७ लाख रुपयांचा गुटखा व एक बोलेरो वाहन जप्त केले आहे. याप्रकरणी हिमायतनगरच्या गुटखा किंग व वाहन चालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिमायतनगर हे गुटखा तस्करीचे एक मोठे केंद्रे असून याठिकाणाहून आजुबाजूच्या तालुक्यांना व गावांना गुटखा पाठविण्यात येतो. तेलंगणातून गुटखा हिमायतनगर येथे आणुन त्यानंतर सदरील गुटखा दुकानांना पुरवठा केला जातो. यापूर्वीही हिमायतनगर येथे लाखो रुपयांचा गुटखा पोलीसांनी पकडलेला आहे. बोलेरो पिकअप वाहनातून गुटखा निर्मल येथुन हिमायतनगरला जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या आदेशावरुन किनवट परिसरात गस्तीवर असलेले फौजदार नागनाथ तुकडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी कोसमेट जवळ रविवारी सापळा रचला. शिवणी येथुन कोसमेटकडे येणारे बोलेरो कंपनीचे पिकअप वाहन क्र.एमएच २६ सीएच-०२६४ पोलीसांनी अडवीले. वाहन चालक सय्यद मो.अली सय्यद सादीक (वय २१) रा.रहीम कॉलनी, हिमायतनगर यास ताब्यात घेवून पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये पान ४ वर

## हॅंड ग्रेनेडचा हातातच स्फोट; चार पोलीस जखमी

अहिल्यानगर:येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान सोमवारी सकाळी भीषण दुर्घटना घडली. हॅंडग्रेनेड हाताळण्याचे प्रात्यक्षिक सुरू असताना अचानक स्मोक हॅंडग्रेनेडचा हातातच स्फोट झाल्याने चार प्रशिक्षणार्थी पोलीस कर्मचारी जखमी झाले. या घटनेत दोघांच्या हाताच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्याने पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

ही घटना सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास घडली. पोलीस मुख्यालयात प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना हॅंडग्रेनेड कसे हाताळावे, याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली जात होती. याचवेळी एका जवानाच्या हातातील स्मोक हॅंडग्रेनेडचा अचानक स्फोट झाला आणि परिसरात एकच गोंधळ उडाला.या दुर्घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. यापैकी दोघांच्या हाताच्या बोटांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्याची माहिती समोर आली आहे. अन्य दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे.घटनेनंतर पोलीस मुख्यालय परिसरात एकच धावपळ सुरू झाली. पान ४ वर

## किनवटच्या वनसंपदेवर मध्यप्रदेशातील डिंक माफियांचा डल्ला

### वनविभाग कारवाई करणार का?



किनवट/प्रतिनिधी-धावन्डा प्रजातीच्या वृक्षांपासून अधिक पटीने डिंकाचे उत्पन्न मिळविण्यासाठी मध्यप्रदेशातील डिंक व्यावसायिकांनी किनवट तालुक्यातील पर्यावरण विघातक प्रवृत्तीच्या लोकांच्या माध्यमातून झाडांवर कुऱ्हाडीचे घाव घालून नैसर्गिक वनसंपदेची वाट लावली. स्थानिक विभागीय वनविकास महामंडळ आणि प्रादेशिक वनविभाग प्रशासनाने अशा लोकांचा शोध घेऊन मध्यप्रदेशातील डिंक माफीयांपर्यंत पोहोचून कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

धावन्डा प्रजातीच्या झाडांच्या डिंकाला जनमानसात अनन्यसाधारण महत्त्व असल्यामुळे मध्यप्रदेशातील डिंक व्यावसायिकांनी किनवट तालुक्यातील जंगल त्यांनी लक्ष केले आहे. गाव पातळीवर वनहक्क समित्या कार्यान्वित असताना सुद्धा वनस्पती वनसंपदेची वाट लावण्याचे धाडस मध्यप्रदेशातील डिंक व्यावसायिक करतातच कसे ? हा वनप्रशासनाला संशोधन करण्यासाठी भाग पाडणारा विषय ठरु शकतो. कारण, झाडाला इंचाइंचावर कुऱ्हाडीने घाव घालून त्यात रासायनिक प्रक्रिया केली जाते. ज्यामुळे त्यांना पाहिजे तेवढा अनैसर्गिक मार्गाने आणि कवडीमोल भावाने डिंक हस्तगत करता येतो. झटपट डिंक मिळविण्याच्या नादात नैसर्गिक धावन्डा झाडांची वयोमर्यादा झपाट्याने खालावत जाणार आहे. इंचाइंचावर कुऱ्हाडीने घाव घालून झडाची चाळणी केल्यामुळे उभी झाडे जागीच वाळन जाण्याची अनेकांनी भिती व्यक्त केली. भीमपूर, पिंताबरवाडी, घोगरवाडी, अंबाडी, शिवनराखेडा, धामनदरी अशा जंगली क्षेत्रातील झाडांवर ही प्रक्रिया पान ४ वर

## 'कॉकरोच'पार्टी बद्दल भावुक होवू नका-सर्वोच्च न्यायालय



नवी दिल्ली:देशभरात गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) या उपरोधिक डिजिटल मोहिमेवर ऐवढे भावूक होवू नका, अशी प्रतिक्रिया सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याविषयी दाखल झालेल्या याचिकेवर सुनावणी करतांना नोंदविली आहे.

कॉकरोच जनता पार्टीविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत न्यायालयीन सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींकडून करण्यात येणाऱ्या तोंडी टिप्पण्यांचा प्रसिद्धीसाठी आणि व्यावसायिक हेतूंसाठी गैरवापर होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, बनावट पदव्यांच्या आधारे वकिली करणाऱ्या कथित बोगस वकिलांची चौकशी करण्याची मागणीही याचिकेत करण्यात आली आहे. मात्र, या विषयावर तातडीने सुनावणी घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करत योग्य वेळी न्यायालय या याचिकेची दखल घेईल, असे सरन्यायाधीशांनी नमूद केले.

## होय रे भाऊ...फक्त प्यादे पकडून तपास पूर्ण होईल का?







नांदेड-होय रे भाऊ, नीट पेपरफुटी प्रकरणात एका मागून एक अटक होताना दिसत आहेत. बातम्या पाहिल्या की वाटतं, आता दोषींना शिक्षा होणार आणि विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय मिटणार. दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे याबद्दल कोणाचंही दुमत असण्याचं कारण नाही. लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी, त्यांच्या स्वप्नांशी आणि मेहनतीशी खेळ करणाऱ्यांना माफी असता कामा नये. पण या सगळ्यात एक प्रश्न सतत डोकँ वर काढतो, जे पकडले जात आहेत ते दोषी असतील परंतु खरोखर मुख्य सूत्रधार आहेत की, फक्त प्यादे?

इतक्या मोठ्या परीक्षेचा पेपर हा एखाद्या एका माणसाने बसून तयार केलेला नसतो. प्रत्येक विषयातील वेगवेगळे तज्ज्ञ प्रश्न तयार करतात. कोणी दहा प्रश्न देतो, कोणी वीस प्रश्न देतो. नंतर ते प्रश्न मॉडरेटरकडे जातात. त्यात चुका आहेत का, एकाच प्रकारचे प्रश्न दोनदा आले आहेत का, त्यांची कठीणता योग्य आहे का, हे सर्व पाहिलं जातं. त्यानंतर वेगवेगळे संच तयार होतात. आणि इथेही काम एका व्यक्तीचं नसतं. अनेक पातळ्यांवर प्रक्रिया चालत असते.

मग शेवटी प्रश्न येतो, परीक्षेला नेमका कोणता संच वापरायचा याचा निर्णय कोण घेतं? सामान्य माणसाच्या समजुतीप्रमाणे ही जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेच्या वरिष्ठ पातळीवर असू शकते. अर्थात मी या विषयातील तज्ज्ञ नाही, पण एवढा साधा प्रश्न पडणं साहजिक आहे. जर अंतिम प्रश्नपत्रिकेचा निर्णय कुठेतरी वरच्या स्तरावर होत असेल, तर तपासाचं लक्ष फक्त खालच्या स्तरावरच्या लोकांवर केंद्रित झालं तर संशय निर्माण होणं स्वाभाविक आहे.

होय रे भाऊ, अनेकदा मोठ्या प्रकरणांमध्ये असं दिसतं की; सर्वात आधी लहान लोक अडकतात. ज्यांनी प्रत्यक्ष काम केलं, ज्यांनी पैसे पोहोचवले, ज्यांनी संपर्क साधला, ते पकडले जातात. पण ज्यांनी संपूर्ण जाळं उभं केलं, ज्यांनी सर्व धागे हातात ठेवले, ते अनेकदा पडद्यामागेच राहतात. मग जनतेसमोर एक चित्र उभं राहतं "पहा, आम्ही कारवाई करत आहोत." काही लोकांना अटक झाली, काहींवर गुन्हे दाखल झाले, आणि सगळ्यांना वाटतं की, आता प्रकरण संपलं. पण खरंच तसं असतं का?

फक्त प्यादे पकडून खेळ जिंकला जात नाही. बुद्धिबळाच्या खेळातही राजा आणि वजीर सुरक्षित असतील तर प्यादे गेल्याने फार फरक पडत नाही. या प्रकरणातही तसंच असेल तर? ही शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. कारण लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या मुलांनी आणि त्यांच्या पालकांनी भरवसा ठेवलेली परीक्षा जर संशयाच्या भोवऱ्यात अडकली, तर फक्त काही अटक करून समाजाचं समाधान होणार नाही.तपास यंत्रणांनी पूर्ण साखळी शोधली पाहिजे. कुठून गळती झाली, कोणत्या पातळीवर झाली, कोणाला माहिती होती आणि कोणाला त्याचा फायदा झाला; हे सगळं स्पष्ट झालं पाहिजे. एनटीएमधील किंवा संबंधित यंत्रणांमधील मोठे मासे हाताशी लागल्याशिवाय हा तपास पूर्ण झाला असं म्हणणं घाईचं ठरेल.

होय रे भाऊ..., हा प्रश्न फक्त पेपरफुटीचा नाही; हा देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास केवळ वरवरचा न राहता पूर्ण गांभीर्याने मुळापर्यंत गेला पाहिजे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेने इसमाचा मृत्यू

नांदेड/प्रतिनिधी-भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना दाभड येथील जिओ पेट्रोल पंपासमोर रविवारी रात्री घडली आहे. दाभड येथील गोविंद बालाजी सवडकर (वय २८) हे रविवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास दाभड येथील जिओ पेट्रोल पंपासमोरुन रस्ता ओलांडत असतांना भरधाव वेगातील वाहनाने धडक दिली. या अपघातात गोविंद सवडकर यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती समजताच महामार्ग सुरक्षा पथकाचे फौजदार जरार अहमद व पोलीस कर्मचारी दाखल झाले. या प्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शांतीसाठी पुढाकार घेणारे गेले कुठे?

जगाच्या इतिहासाकडे पाहिले तर युद्धे ही मानवजातीसाठी प्रगतीची नव्हे, तर विनाशाची कारणे ठरली आहेत. दोन महायुद्धांनंतर जगाने शांततेची भाषा शिकण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्रसंघासारख्या संस्था स्थापन झाल्या, आंतरराष्ट्रीय करार झाले आणि संघर्षाऐवजी संवादाला महत्त्व देण्याचा प्रयत्न झाला. मात्र आजची जागतिक परिस्थिती पाहिली, तर हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे येतो की शांतीसाठी पुढाकार घेणारे गेले कुठे? सध्या जगातील अनेक भागांमध्ये अस्थिरता आणि संघर्ष वाढताना दिसत आहे. युद्धाचा फटका केवळ सहभागी राष्ट्रांनाच बसतो असे नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगभर उमटतात. इंधनाचे दर वाढणे, पुरवठा साखळीवर परिणाम होणे, आर्थिक अस्थिरता निर्माण होणे, महागाई वाढणे आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावर थेट परिणाम होणे या गोष्टी जगाने वारंवार अनुभवल्या आहेत. एका देशातील संघर्षामुळे हजारो किलोमीटर दूर असलेल्या देशांतील सामान्य माणसाच्या घरगुती बजेटवर परिणाम होतो, ही आजच्या जागतिक व्यवस्थेची वस्तुस्थिती आहे. अशा संघर्षांमध्ये सहभागी राष्ट्रांना नेमके काय मिळते?, हा प्रश्न नेहमीच अनुत्तरित राहतो. राष्ट्रहित, सुरक्षा, सामरिक वर्चस्व, आर्थिक हितसंबंध किंवा राजकीय महत्त्वाकांक्षा यांसारखी अनेक कारणे युद्धामागे सांगितली जातात. परंतु शेवटी युद्धातून मिळते ते फक्त मानवी जीवितहानी, उद्ध्वस्त अर्थव्यवस्था आणि अनेक पिढ्यांपर्यंत टिकणारी सामाजिक जखम. युद्ध संपल्यानंतर शहरांची पुनर्बांधणी करता येते, अर्थव्यवस्था पुन्हा उभी करता येते; पण गमावलेले जीव आणि तुटलेले सामाजिक संबंध पुन्हा उभे करता येत नाहीत. काही काळापूर्वी विविध देशांतील संघर्षांच्या वेळी अनेक राष्ट्रांनी मध्यस्थीचे प्रयत्न केले होते. संवादाच्या माध्यमातून संघर्ष कमी करण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न झाले. अनेक देशांनी हे स्पष्ट केले होते की, युद्ध हा कोणत्याही समस्येचा कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. कारण युद्धात कोणाचाही खरा विजय होत नाही. एका बाजूला शस्त्रास्त्रांचा वापर वाढतो, तर दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिकांच्या आयुष्याची राख होते.आज मात्र अनेक जागतिक प्रश्नांवर मोठी राष्ट्रे तुलनेने शांत दिसत आहेत. पूर्वी जागतिक शांततेचे संदेश देणारे देश, आंतरराष्ट्रीय संस्था किंवा प्रभावी नेतृत्व आज पुरेशा ताकदीने पुढे येताना दिसत नाही. यामागे अनेक कारणे असू शकतात. बदलती भू-राजकीय समीकरणे, आर्थिक हितसंबंध, महासत्तांमधील स्पर्धा किंवा स्वतःच्या राष्ट्रीय प्रश्नांना दिले जाणारे प्राधान्य यामुळे शांततेच्या प्रयत्नांमध्ये कमतरता जाणवत असावी. मात्र सामान्य नागरिकांच्या दृष्टीने या कारणांना फारसे महत्त्व राहत नाही. त्यांना फक्त एवढेच दिसते की, जगात अस्थिरता वाढत आहे आणि शांतीची भाषा मागे पडत चालली आहे.जागतिक शांतता ही केवळ मोठ्या राष्ट्रांची जबाबदारी नाही. आंतरराष्ट्रीय संस्था, प्रादेशिक संघटना आणि विविध देशांनी मिळून संवादाचे मार्ग खुले ठेवले पाहिजेत. युद्धाची परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच मतभेद दूर करण्यासाठी राजनैतिक पातळीवर अधिक प्रभावी प्रयत्न झाले पाहिजेत. कारण युद्ध सुरू झाल्यानंतर त्यावर नियंत्रण मिळवणे अधिक कठीण होते.आज गरज आहे ती सामर्थ्याच्या प्रदर्शनापेक्षा संवादाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवण्याची. आधुनिक जगात विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या शर्यतीत पुढे जात असताना मानवतेची मूल्ये मागे पडता कामा नयेत. जगातील प्रत्येक संघर्ष हा केवळ सीमांचा किंवा सत्तेचा प्रश्न नसतो; तो मानवी अस्तित्वाशी जोडलेला असतो. शांततेसाठी पुढाकार घेणारे संपलेले नाहीत; मात्र त्यांचा आवाज आजच्या संघर्षाच्या गोंगाटात दडपला गेला आहे. तो पुन्हा प्रभावीपणे ऐकू येणे हीच काळाची खरी गरज आहे. कारण युद्धातून फक्त विनाश मिळतो, तर शांततेतूनच विकास, स्थैर्य आणि मानवतेचे भविष्य सुरक्षित होऊ शकते.

# वनविभागाचे दुर्लक्ष आणि जंगल तोडीमुळेच हिंसक पशुंकडून मानवी हाणी



रमेश लांजेवार
नागपूर.

राज्यासह देशात वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण,सीमेंट रोड,अनिर्बंध बांधकाम व काही ठिकाणी धार्मिकतेच्या नावावर मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे आणि ही बाब सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे तरीही काणावर हात आणि तोंडावर बोट ठेवून बघ्यांच्या भुमिकेत असतांना दिसते.याचाच परिणाम आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल,) यांची मानवावर व पाळीव प्राण्यांनवर आक्रमकता वाढल्याचे दिसून येते. सरकार दरवर्षी सांगत असते की, हजारो कोटींच्या झाडांचे वृक्षलागवड केली.परंतू प्रत्यक्षात वृक्षलागवड झालीच नसते फक्त ती कागदावरच झाल्याचे दिसून येते. आज सरकारने जंगल कटाई करून औद्योगिकरण, शहरीकरण व सिमेंट रोडचे मोठ्या प्रमाणात जाळे विणले व याचा दुष्परिणाम हळूहळू सर्वत्र जाणवत आहे.अशा परिस्थितीत सरकार झाडांची लागवड कुठे करीत आहे ही बाब समजण्यापलीकडची असल्याचे मला वाटते.सरकारकडून होणारी वृक्षलागवड १०० टक्या पैकी ८० टक्के लागवड फक्त कागदावरच असल्याचे वरील घटनांवरून दिसून येते.

आज जंगल तोडीच्या कारणांमुळेच चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात वाघाच्या हल्यात चार महिलांचा बळी गेल्याचे दिसून येते. सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाहीच्या जंगलात दि.२२ मे २०२६ ला सकाळी तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलांवर वाघाने हल्ला करून चौघींना जागीच ठार केले. अशीच घटना मागील वर्षी मे महिन्यातच तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या तीन महिलांना वाघाने हल्ला करून ठार मारले होते. अशा भयानक घटना सरकारच्या डोळ्यासमोर असुन सुद्धा जंगलतोड थांबलेली नाही व तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांना सरकारने कोणतेही संरक्षण दिलेले नाही हा अत्यंत चिंतेचा विषय आहे. आज जगातील सर्वात जास्त उष्ण शहरांच्या बाबतीत विचार केला तर भारतातील ५० शहरांमध्ये सुर्य आग ओकत आहे ही देशासाठी मोठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल. कारण दिवसेंदिवस देशातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढतच आहे. दिल्ली, यूपी, मध्यप्रदेश, महाराष्ट्रात पुढील ७ दिवस तापमानात वाढ होणार असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या राज्यातील अनेक शहरे रेड अलर्ट वर आहेत. आज महाराष्ट्रासह देशातील अनेक शहरांचे तापमानाने आपली संपूर्ण सिमा रेषा ओलांडली असून बहुतांश भागात ४५ अंश सेल्सिअस पार झाल्याचे दिसून येते. आज उष्णतेने संपूर्ण विदर्भ होरपळत आहे वर्धा-४७.१, ब्रम्हपुरी -४७.२, नागपूर -४६.६, अमरावती -४६.४, चंद्रपूर -४६.२ आणि इतर शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पार केल्याचे दिसून येते. यामुळेच हिंसक पशुंना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागत. कारण जंगलातील पाणथड्या सुध्दा आटल्या आहेत. बदलत्या हवामानामुळे, वाढत्या तापमानामुळे आणि जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांसाठी असणारा पाणीसाठा संपुष्टात आल्याने वाघ-बिबट्या सारखे हिंसक पशुं गावाकडे किंव्रा गावांच्या आसपासच्या परिसरात किंव्रा शहराकडे धाव घेतांना दिसतात.

त्यामुळे आज चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात चार महिलांचा वाघाच्या हल्यात बळी गेल्याचे दिसून येते. मागील पाच वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यात २०२१-२५ दरम्यान २०० जणांचा वन्यजीव हल्यात मृत्यू झाला आणि चालू वर्षातील पाच महिन्यांतील आकडा १९ वर येवून पोहोचला आहे. अशा प्रकारे आतापर्यंत २१९ जणांचा बळी गेला. परंतु सरकारने यावर ठोस उपाययोजना अजुन पर्यंत केलेली ही शोकांतिका म्हणावी लागेल. अशा गंभीर घटनांवर सरकारने कायमस्वरूपी उपाय योजना अमलात आणावी लागेल तेव्हाच हिंसक पशुंवर नियंत्रण ठेवता येईल. कारण वनविभाग आणि शासनाकडून प्रत्यक्ष उपाययोजनांचा अभाव असल्याने मोठ्या जीवीत हाणी होत आहे याचे जिवंत उदाहरण चंद्रपूरमध्ये दिसून आले हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे.आज जंगल तोडीमुळे हिंसक पशुं मानव व पाळीव प्राण्यांनवर हल्ले करीतच आहेत सोबतच जंगल तोडीचा परिणाम पाण्याची समस्या, अकाल इत्यादी अनेक गोष्टींशी निगडीत असल्याने पुढे चालून याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागतील. कारण वाढत्या तापमान व ढासळती वनसंपदा यामुळेच हिंसक पशुंनी मानवावर आक्रमणाचा पवित्रा घेतल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या अनेक वर्षांपासून चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलन सुरू आहे.या संकलनातून दरवर्षी ३५ हजार कुटुंबांना रोजगार मिळतो. उन्हाळ्यात शेतीची कामे नसल्याने अनेक कुटुंबे जंगलात जाऊन तेंदूपत्ता संकलन करतात व आपला उदरनिर्वाह करतात. ही बाब वनविभाग व सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात असतांना सुध्दा मजुरांना हिंसक पशुंपासुन सरकार संरक्षण करू शकत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. महाराष्ट्रात वन्यजीव प्राण्यांच्या हल्याने वाढती जीवीत हाणी अत्यंत चिंताजनक आहे यामध्ये २०२० मध्ये ९३ लोकांचा बळी गेला, २०२१ मध्ये ११८, २०२२ मध्ये १३४,२०२३ मध्ये-१४७,२०२४ मध्ये-१६७ आणि २०२५ मे पर्यंत ७२ जणांचा मृत्यू हिंसक पशुमुळे झाला आहे.ही संपूर्ण मानवीय हाणी जंगल कटाईमुळे निर्माण झालेली मोठी समस्या आहे यावर सरकारने ताबडतोब उपाययोजना करणे गरजेचे आहे.वन्य प्राण्यांना (विशेषतः बिबट्यां,वाघ) वन्यप्राण्यांपासुन मानवी हाणी रोखण्यासाठी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलात शेळ्या सोडण्याचे म्हटले होते. तरीही वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात मानवी हाणी होतांना आपण पहातो ही अत्यंत गंभीर बाब आहे. हिंसक प्राण्यांपासून होणारी मानवीय हाणी याचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने यावर तातडीने उपाययोजना करावीत.जय हिंद.

# माहूर-किनवटमध्ये विरोधी पक्ष संपला का...?

## जनतेच्या प्रश्नांवर मौन;आंदोलनाची धार बोथट

सरफराज दोसानी

माहूर:लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांइतकाच विरोधी पक्षही महत्त्वाचा असतो. कारण विरोधी पक्ष हा केवळ टीका करणारा नसून जनतेच्या प्रश्नांसाठी शासनाला जाब विचारणारा, चुकीच्या धोरणांना विरोध करणारा आणि लोकशाहीचा समतोल राखणारा मजबूत स्तंभ मानला जातो. मात्र माहूर-किनवट मतदारसंघात हा स्तंभ आता ढासळल्याचे चित्र स्पष्टपणे दिसू लागले आहे. विरोधकांचे अस्तित्व केवळ बॅनरबाजी, सोशल मीडियावरील प्रतिक्रिया आणि माध्यमांपुरतेच मर्यादित राहिले असून रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची ताकदच हरवली का, असा संतप्त सवाल नागरिक विचारू लागले आहेत.

दिवंगत आ.प्रदीप नाईक यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अक्षरशः पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळताना दिसत आहे. एकेकाळी तालुक्यात प्रभावी संघटनात्मक ताकद असलेला पक्ष आता अंतर्गत गटबाजी, नेतृत्वाचा अभाव आणि कार्यकर्त्यांच्या निष्क्रियतेमुळे विखुरलेला दिसतो. दुसरीकडे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या भाजप प्रवेशानंतर काँग्रेसची अवस्था तर अधिकच बिकट झाली आहे. माहूर-किनवटमध्ये काँग्रेस पक्ष स्वतःचे अस्तित्व शोधत फिरत असल्याचे चित्र आहे. अनेक गावांमध्ये पक्षाचे कार्यालय, बैठक किंव्रा जनआंदोलन तर दूरच; साधे निवेदन देण्याची ताकदही उरली नसल्याची चर्चा आहे.शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे स्थानिक नेते ज्योतिबा खराटे हे माध्यमांमध्ये सत्ताधाऱ्यांवर टीका करून आपले अस्तित्व साबूत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.तरी ती टीका प्रत्यक्ष आंदोलनात किंव्रा जनसंघर्षात परिवर्तित होताना दिसत नाही. कम्युनिस्ट पक्ष आपल्या विचारधारेनुसार कासवगतीने का होईना पुढे जात असला तरी शासनाविरोधात आक्रमक भूमिका घेण्याचे धाडस त्यांचा मध्ये आहे हे मोठ्या मानणे कबूल करावे लागेल.त्यामुळे संपूर्ण विरोधकांची अवस्था ना संघर्ष, ना आंदोलन, ना दबाव अशी झाली आहे.

माहूर-किनवट तालुक्यात शेतकऱ्यांचा पीक विम्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. अनेक शेतकरी महिनोनमहिने विमा मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. पावसाच्या लहरीपणामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळणे अपेक्षित असताना विरोधक मात्र शांत बसल्याने शेतकरी वर्गात प्रचंड नाराजी आहे. दुसरीकडे अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. विहिरी कोरड्या पडत आहेत, बोअर बंद पडत आहेत आणि महिलांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे.विशेष म्हणजे पाणीटंचाई संदर्भातील आढावा बैठकींनाच बगल देत प्रशासन मनमानी पद्धतीने उपाययोजना राबवत असल्याचा आरोप होत आहे. कागदोपत्री आराखडे तयार होत असले तरी प्रत्यक्षात अनेक ग्रामपंचायतींचे प्रस्ताव अजूनही मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. निधी कुठे जातोय, कोणाला लाभ होतोय, कोणाच्या हितासाठी योजना आखल्या जात आहेत, याचा जाब विचारणारा सक्षम विरोधी पक्षच नसल्याने प्रशासनावर कोणताही दबाव उरलेला नाही. इंधन दरवाढ, पेट्रोल-डिझेल टंचाई, महागाई, बेरोजगारी आणि नीट पेपरफुटीसारख्या गंभीर मुद्द्यांवर राज्यभर संताप व्यक्त होत आहे.

अनेक ठिकाणी विरोधक रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. मात्र माहूरमध्ये ना मोर्चा, ना धरणे, ना निवेदन, ना निषेध! जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर संपूर्ण शांतता पाळली जात असल्याने माहूर-किनवटमध्ये विरोधी पक्ष उरलाच आहे का? असा थेट प्रश्न आता सामान्य नागरिक विचारू लागले आहेत. लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी मजबूत विरोधक आवश्यक असतात. पण जर विरोधकच निष्क्रिय झाले, तर प्रशासन बेफाम होते आणि जनतेचे प्रश्न वाऱ्यावर सोडले जातात. आज माहूर-किनवटमध्ये नेमकी तीच परिस्थिती निर्माण झाली असून जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारा खरा विरोधी आवाज निर्माण होण्याची गरज तीव्रतेने जाणवत आहे.

# सांगवीत आगीचे तांडव,दोन शेतकरी बंधूंचा संसार बेचिराक

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मौजे सांगवी येथे अल्पभूधारक शेतकरी कुटुंबावर काळाने घाला घातला आहे. दि. २२ मे रोजी दुपारी शेतकरी मष्णाजी सूर्यवंशी व राजू सूर्यवंशी या दोन सख्ख्या बंधूंच्या राहत्या घराला भीषण आग लागून घरातील अन्नधान्य,भांडेकुंडी, कपडेलत्ता व संसारोपयोगी सर्व साहित्य जळून खाक झाले आहे.

अचानक कोसळलेल्या या संकटामुळे संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे. लागलेल्या आगीत सूर्यवंशी बंधूंचे दगड-मातीचे घर पूर्णपणे बेचिराख झाले. भिंती काळवंडल्या, छताचे लाकूड व कौले जळून खाली पडली, स्टीलची भांडी वितळली, धान्याच्या कणग्या जळाल्या. वर्षभर पुरेल एवढे ज्वारी, गहू, तूर, मुलांचे कपडे, शाळेची पुस्तके, महत्त्वाची कागदपत्रे, टीव्ही, पंखा सर्व आगीत भस्मसात झाले. शेजाऱ्यांनी आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत सर्व संपले होते. अंगावरच्या कपड्याशिवाय काही उरले नाही अल्पभूधारक



असलेले सूर्यवंशी बंधू शेतीवरच कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. पोटाला चिमटा काढून साठवलेलं धान्य गेलं. मुलांच्या अंगावरच्या कपड्याशिवाय काही उरलं नाही. पुढचा पावसाळा कसा काढायचा? राहायचं कुठं? असा हृदय पिळवटून टाकणारा आक्रोश मष्णाजी सूर्यवंशी यांच्या पत्नीने केला. घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते प्रकाश काळे पुंजरवाडीकर, गोपाळ मोरे, मन्मथ काळे, श्रीधर मोरे, माधव हुग्गे, बाळू काळे व गावकरी मंडळींनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तात्काळ देगलूरचे तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून आपत्ती व्यवस्थापन निधी अंतर्गत सूर्यवंशी कुटुंबाला तातडीने रोख मदत, धान्य व ताडपत्री देण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने संवेदनशीलता दाखवावी सूर्यवंशी बंधू अल्पभूधारक शेतकरी आहेत. नैसर्गिक आपत्तीत त्यांचे संपूर्ण घर उध्वस्त झाले आहे. शासनाने तात्काळ पंचनामा करून घरकुल योजनेतून घर मंजूर करावे, ५० हजारांची तात्काळ रोख मदत व ३ महिने पुरेल एवढे धान्य द्यावे अशी मागणी प्रकाश काळे यांनी केली.

# शेतकऱ्यांना प्राधान्याने ६० टक्के डिझेल द्या-आ.कोहळीकर

हदगांव/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात सध्या खरीप हंगामातील शेतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून पेरणीचे दिवस अत्यंत जवळ आले आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांना वेळेवर डिझेल मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे जिल्ह्यातील पेट्रोल पंपांवर एकूण साठ्यापैकी किमान ६० टक्के डिझेल शेतकऱ्यांसाठी राखीव ठेवण्याची मागणी केली आहे.

आ.कोहळीकर यांनी पत्रात नमूद केले आहे की, शेतकरी ट्रॅक्टर, पंप, आणि इतर कृषी यंत्रसामग्रीसाठी पूर्णपणे डिझेलवर अवलंबून आहेत. मात्र, पेट्रोल पंपांवर डिझेल वेळेत उपलब्ध होत नसल्याने शेतीच्या कामांमध्ये मोठे अडथळे निर्माण होत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



६० टक्केसाठा राखीव: जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवरील उपलब्ध एकूण पेट्रोल-डिझेल साठ्यापैकी किमान ६० टक्के डिझेल केवळ शेतकरी व कृषी उपयोगासाठी राखीव ठेवण्यात यावे सर्वसामान्यांसाठी ४० टक्के साठा: उर्वरित ४० टक्के इंधन इतर वाहनांसाठी व सर्वसामान्य वापरासाठी वितरित करण्यात यावे., शेतकऱ्यांना प्राधान्याने डिझेल मिळत आहे की नाही, याची तपासणी करण्यासाठी विशेष भरारी पथकांची नियुक्ती करावी., पेट्रोल पंप चालकांनी शेतीकामासाठी आलेल्या ट्रॅक्टर व कृषी वाहनांना प्राधान्याने इंधन देण्याबाबत स्पष्ट आदेश द्यावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या पेट्रोल पंपांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी.हा विषय अत्यंत तातडीचा असून शेती व शेतकऱ्यांच्या हितासाठी जिल्हा प्रशासनाने यावर त्वरित निर्णय घेऊन सहकार्य करावे अशी आग्रही विनंती आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. या पत्राची प्रत माहितीसाठी सर्व पत्रकार बांधवांनाही पाठवण्यात आली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# किनवट नगर परिषदेत 'सुजल व निर्मल जल' निधीत १.३५ कोटींचा संशयास्पद व्यवहार

## माजी गटनेते जहिरोद्दीनखान यांचे सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

किनवट/प्रतिनिधी-सुजल व निर्मलजल अभियान या लेखाशीर्षांतर्गत केलेल्या कामात तब्बल १ कोटी ३५ लाख रुपयांची आर्थिक अनियमितता आणि संशयास्पद व्यवहारास लेखापाल आणि रोखपालच कारणीभूत आहेत. १२ ऑगस्ट २०२२ च्या विशेष सभेच्या कार्यवृतांतातून याच मुद्यावर चर्चा होऊन सभागृहात तसा निष्कर्ष नोंदविण्यात आलाय. सद्या सुरू असलेल्या लेखापरीक्षण (ऑडिट) प्रक्रियेत या प्रकरणाचा समावेश करण्यात यावा. सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी किनवट नगर परिषदेतील रा.काँ.चे माजी गटनेते जहिरोद्दीन खान यांनी सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

किनवट नगर परिषदेच्या भारतीय स्टेट बँकेतील सुजल व निर्मलजल अभियान या शीर्षकाच्या दोन वेगवेगळ्या बँक खात्यांमधून एकूण १ कोटी ३५ लाख ७३ हजार ४६३ रुपयांची रक्कम खर्ची पडल्याचे उघड झाले होते. यामध्ये खाते क्र.६२१६९००४३६५ मधून ७६,२५,३६४ रुपये आणि खाते क्र.६२११०४५३७३८ मधून ४९,४८,००९ रुपये अशा रक्कमेची उचल करण्यात आली होती. पाच महिने माहिती लपवली? विशेष म्हणजे, सदर रक्कम न्यायालयीन आदेशाच्या नावाखाली बँकेतून खर्ची पाडण्यात आली असली, तरी या व्यवहाराबाबत तत्कालीन मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक किंवा नगर परिषद प्रशासनाला कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आलेली नव्हती. एवढेच नव्हे तर, धनादेश (चेक) वटल्यानंतर तब्बल पाच महिन्यांपर्यंत संबंधित लेखापाल व रोखपाल यांनी ही माहिती प्रशासनापासून जाणीवपूर्वक लपवून ठेवल्याचे नगर परिषदेच्या विशेष सभेच्या कार्यवृत्तांतावरून स्पष्ट होत असल्याचा आरोप जहिरोद्दीनखान यांनी केला आहे. याच नाण्याची दुसरी बाजू समजून घेण्याचा प्रयत्न केला मात्र प्रतिसाद मिळाला नाही हे विशेष.

तत्कालीन लेखापाल बिराजदार आणि तत्कालीन रोखपाल सय्यद अझहरअली यांच्या भूमिकेवर गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे. न्यायालयीन प्रकरणांमध्ये विधिज्ञांची सततची अनुपस्थिती, संबंधित विभागाने वेळेवर केलेल्या पाठपुराव्याचा अभाव, प्रशासनाला माहिती न देणे आणि आर्थिक व्यवहारांची गोपनीयता राखणे, यावरून यात मोठे संगनमत व आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता निवेदनात नोंदवलीय. यापूर्वीच नगरसेवकांच्या तीव्र नाराजीनंतर संबंधित कर्मचाऱ्यांचा पदभार काढून विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आले होते. मात्र प्रकरण आजपावेतो जाणीवपूर्वक थंड बस्त्यात अडकवले होते. म्हणून किमान आतातरी फौजदारी कारवाई झालीच पाहिजे या निर्णयावर जहिरोद्दीनखान पोहोचले आहेत.

किनवट नगर परिषदेत सद्यस्थितीत लेखापरीक्षण




(ऑडीट) प्रक्रिया सुरू आहे. या ऑडीटमध्ये या प्रकरणाचा विशेष समावेश करून सर्व बँक व्यवहार, न्यायालयीन आदेश, धनादेश प्रक्रिया आणि संबंधित फाईल्सची सखोल चौकशी करण्यात यावी. सार्वजनिक विकासाच्या निधीत जाणीवपूर्वक संगनमत करुन संघटीतपणे आपहारात सहभागी असलेल्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात जहिरोद्दीनखान यांनी केली आहे. दरम्यान माजी नगराध्यक्ष आनंद मच्चेवार यांच्याशी संपर्क साधला असता सदर प्रकरण २००९ या कालावधीतील असून १२ ऑगस्ट २०२२ च्या विशेष सभेच्या कार्यवृतांतातून सभागृहाने भूमिका स्पष्ट केली असल्याचे सांगितले.

### विधान परिषद निवडणुकीपूर्वी खळबळ;काँग्रेसचे ६० नगरसेवक नॉट रिचेबल

नागपूर:महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापू लागलं असून, पूर्व विदर्भात मोठ्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाचे अंतिम चित्र अद्याप स्पष्ट झाले नसतानाच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मतदारांची पळवापळवी सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी थेट घोडेबाजाराचे गंभीर आरोप केले आहेत.चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेसचे तब्बल ६० हून अधिक नगरसेवक अचानक संपर्काबाहेर गेल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः सिंदेवाही नगरपंचायतीचे नगराध्यक्ष आणि काही महत्त्वाचे नगरसेवकांचे मोबाईल फोन नॉट रिचेबल लागत असल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# उमरी-नायगाव प्रलंबित रस्ता अखेर मार्गी

नायगाव/प्रतिनिधी-मागील दोन दशकांपासून प्रलंबित असलेला उमरी-नायगाव हा महत्त्वाचा रस्ता अखेर मार्गी लागल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या रस्त्याच्या कामाला गती मिळाल्याने व्यापारी, विद्यार्थी, वाहनचालक आणि ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

पूर्वी या मार्गावर खड्डे, धूळ आणि वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत होती. विशेषतः पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र आता रस्त्याचे काम वेगाने सुरू असून दर्जेदार रस्ता तयार होत असल्याने प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सोयीस्कर होणार आहे. उमरी आणि नायगाव या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारा हा मार्ग बाजारपेठ, शाळा, महाविद्यालये, क्लासेस तसेच ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे या रस्त्यामुळे स्थानिक व्यापाराला मोठी चालना मिळण्यासोबतच वाहतुकीची समस्या देखील मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याचे



नागरिकांनी सांगितले. यासोबतच नायगाव-शेळगाव रोडवरील नाली बांधकाम व रस्त्याचे कामही वेगाने प्रगतीपथावर असल्याने जनतेतून समाधान व्यक्त होत आहे. शहरातील पायाभूत सुविधांमध्ये होत असलेल्या सुधारणा पाहता उमरी-नायगाव परिसराच्या विकासाला आता अधिक वेग मिळणार असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासन आणि संबंधित विभागाचे आभार व्यक्त करत उर्वरित कामेही गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हा प्रलंबित रस्ता मार्गी लागल्याने तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

# देगलूर तालुक्यात इंधन तुटवडा; वाहनधारक,बळीराजा अडचणीत

देगलूर/प्रतिनिधी-सहज मिळणारे पेट्रोल, डिझेल तुटवड्यामुळे मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे विविध पेट्रोल पंपावर इंधनासाठी लांबच्या लांब रांगा लागले आहेत. त्यामुळे वाहनधारक व बळीराजा अडचणीत सापडला आहे.

देगलूर तालुक्यासह हाणेगाव, करडखेड, चाकूर पाटी,खानापूर फाटा, देगलूर शहरात सुद्धा गेल्या काही दिवसापासून पेट्रोल, डिझेलचा तेवढा निर्माण झाला आहे. वाहनधारकासह शेतकरी वर्गाला मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. अनेक पेट्रोल पंपावर पेट्रोल उपलब्ध नसल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. काही ठिकाणी पेट्रोल संपले अशी फलक लावण्यात आली असून देगलूर शहर व परिसरातील पेट्रोल पंपावर एक एक किलोमीटर अंतरावर वाहनाच्या रांगा लागल्या आहेत. सध्या शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त असून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पंप आणि इतर शेतीसाठी लागणाऱ्या वाहनांसाठी डिझेलची मोठी गरज आहे. मात्र पेट्रोल, डिझेल मिळत नसल्यामुळे शेतीची कामे खोळंबली आहेत. बळीराजाची चिंता वाढली आहे तर दुसरीकडे विविध कामासह शालेय विद्यार्थी, पालक, नोकरदार, आणि व्यापाऱ्यांनाही दैनंदिन प्रवास करताना सहज मिळणाऱ्या पेट्रोलच्या तुटवड्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. इंधनपुरवठा सुरळीत करण्यासाठी शासन प्रशासनाकडून तातडीने लक्ष देण्याची मागणी वाहनधारकांनी केली आहे.

# रस्त्यावरील धुळ व खड्डेमय रस्त्यांमुळे हदगावकर त्रस्त

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील नागरिक सध्या प्रचंड धुळीचा त्रास, खड्डेमय रस्ते व इतर नागरी समस्यांनी त्रस्त झाले आहेत. शहरातील मुख्य रस्त्यांची दयनीय अवस्था आणि बायपास मार्गाच्या अभावामुळे नागरिक अक्षरशः वैतागले असून प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोरील रस्ता अनेक दिवसांपासून खोदून ठेवण्यात आला आहे. मात्र हे काम अद्याप अपूर्ण अवस्थेत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. नागरिकांना या धुळीमुळे श्वास घेणेही कठीण झाले असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.तसेच जुने बसस्थानक, आजाद चौक ते दत्त बर्डी पर्यंतच्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे, उखडलेले रस्ते आणि रखडलेली कामे यामुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सकाळ-संध्याकाळ वाहतुकीची गर्दी वाढल्यानंतर धुळीचा त्रास अधिक गंभीर बनत असून नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे. श्वसनाचे आजार, डोळ्यांची जळजळ व इतर आरोग्य समस्या वाढत असल्याची तक्रार नागरिक करत आहेत. दरम्यान, शहरासाठी अद्याप बायपास रस्ता निर्माण न झाल्याने जड वाहने शहरातूनच जात आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. अनेक वर्षांपासून बायपासची मागणी होत असतानाही याबाबत कोणताही ठोस निर्णय न झाल्याने नागरिकांमध्ये रोष वाढत आहे.नागरिकांनी स्थानिक प्रशासन, नगरसेवक व नगराध्यक्षांकडे तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करून गुणवत्तापूर्ण कामे पूर्ण करण्याची तसेच शहरासाठी बायपास मार्ग मंजूर करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात आ.बाबुराव कदम कोहळीकर यांच्याकडेही निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

### तक्रार करायची तरी कुणाकडे?

हदगाव नगरपालिकेची निवडणूक होऊन चार महिने उलटून गेले असतानाही बांधकाम सभापती, आरोग्य सभापती, बालविकास सभापती अशा महत्त्वाच्या समित्यांचे गठन अद्याप झालेले नाही. निवडणुकी दरम्यान शिवसेना, भाजप, काँग्रेस तसेच शिवसेना (शिंदे गट) यांनी नागरी समस्यांबाबत विविध आश्वासने दिली होती. मात्र निवडून आल्यानंतर नगरसेवक नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, सध्या नगरपालिकेत शिवसेना (ठाकरे गट) ७ शिवसेना (शिंदे गट). ६ काँग्रेस ५ भाजापा ३ स्विकृत सदस्य शिवसेना (शिंदे गट ) १ महविकास आघाडीच १ तर शिवसेना (शिंदेगट) कडून नगराध्यक्षपदी महिला असून तर शिवसेना ठाकरे गटाकडून उपनगर उपनगराध्यक्ष करिता ही महिलाच आहे. हे उल्लेखनिय आहे.

# खत टंचाई विरोधात कृषी सेवा केंद्रे,आडत दुकाने कडकडीत बंद

## देगलूरात ठाकरे सेनेचे आंदोलन

देगलूर/प्रतिनिधी-खरीप हंगाम तोंडावर असताना डीएपी, युरिया आदी रासायनिक खतांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या वतीने सोमवार, २५ मे रोजी देगलूर शहरातील कृषी सेवा केंद्रे, मोंढा बाजार व आडत दुकाने कडकडीत बंद ठेवून तीव्र आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांना तात्काळ मुबलक प्रमाणात खते उपलब्ध करून द्यावीत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

खरीप हंगामासाठी सोयाबीन, मुग, उडीद, कापूस आदी पिकांच्या पेरणीपूर्वी डीएपी व युरिया खतांची मोठ्या प्रमाणात गरज असते. मात्र शासनाच्या निष्क्रिय धोरणामुळे शेतकऱ्यांना खतांसाठी भटकंती करावी लागत असून अनेकांना तेलंगणा, आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यात जादा दराने खते खरेदी करण्याची वेळ आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या घोषणा करणाऱ्या शासनाला अन्नदात्याला वेळेवर खत उपलब्ध करून देता येत नसेल, तर यापेक्षा मोठे दुर्दैव दुसरे नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. या आंदोलनात शिवसेना (ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, पांडुरंग पाटील थडके देगावकर, राजेंद्र इंगळे खानापूरकर, मष्णाजी पैलावार, मानाजी पाटील लोणे लोणीकर, सय्यद मिरभाई, इस्माईलखान पठाण, भगवान जाधव, भागवत पाटील सोमुरकर, राहुल सोनकांबळे, विनोद सोनकांबळे, राजू उल्लेवार मुजळगेकर, गंगाधर पाटील चाकूरकर, राम राजुने, हाणमंत राजुरे लखखेकर, शिवाजी सोनकांबळे मुजळगेकर, नागनाथ विभुते चैनपुरकर, अशोक मारवाडे, अजित पाटील पाळेकर, शिवाजी ढोसणीकर, संतोष कांबळे, देविदास घायाळे, गंगाधर वकंलवार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, शेतमजूर, हमाल व मापाडी सहभागी झाले होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शहरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### जुन्या वादातून मारहाण

नांदेड/प्रतिनिधी-शिवनगर इतवारा येथे २२ मे रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास माला संभा गायकवाड (वय ३७) यांना आरोपींनी जुन्या भांडणाच्या कारणावरुन मारहाण करुन, जिवे मारण्याची धमकी दिली. माला गायकवाड यांच्या फिर्यादीवरुन आरोपी सोनु संभाजी धडके, ऋषीकेश संभाजी धडके, कामेश संभाजी धडके, गंगाधर संभाजी धडके, अर्जून संभाजी धडके, पारु गंगाधर धडके, संतोष संभाजी धडके (सर्व रा.शिवनगर) यांच्या विरुध्द इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोउपनि आगलावे हे करत आहेत.

तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड
प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ,चिखलवाडी,
नांदेड. पिन-४३१६०१
जा.क्र.२०२५/जन्म प्रमाणपत्र/सिआर-२९३/२०२५ दिनांक २१/०५/२०२६

**जाहीर प्रगटन (जन्म नोंद आदेशासाठी)**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार नागेश चंदर पवार वय ३१ रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव लखन नागेश पवार रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड या सदर व्यक्तीचा राहते घर बाभुळगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २३.०९.२०११ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक १०.०४.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज पुराव्यासह सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक-२१/०५/२०२६
स्थळ-नांदेड

स्वाक्षरित/-
तहसिलदार नांदेड तथा
तालुका दंडाधिकारी नांदेड करिता

# रस्त्याची तात्काळ दुरुस्ती न झाल्यास नागरिकांचा आमरण उपोषणाचा इशारा

देगलूर/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील सावरमाळ, सावळी ते मरखेल तसेच सावळी ते मष्णेर या प्रमुख मार्गांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिक, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. वारंवार निवेदने देऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने संतप्त नागरिकांनी आता सार्वजनिक बांधकाम विभागासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत काळे बेन्नाळखर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर केले आहे. यापूर्वीही १५ डिसेंबर २०२५, १९ डिसेंबर २०२५ व २६ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आली होती. त्यावेळी काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजपर्यंत ना रस्ता दुरुस्ती झाली ना डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले. सावरमाळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे सावळी व बेन्नाळ परिसरातील रुग्णांना उपचारासाठी या मार्गाने ये-जा करावी लागते. खराब रस्त्यामुळे गर्भवती महिला व गंभीर रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. तसेच सावळी ते मष्णेर मार्गावर हिंदू धर्मियांचे प्रसिद्ध देवस्थान असल्याने तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. मात्र रस्त्याची बिकट अवस्था आणि अर्धवट सोडलेले डांबरीकरण यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मरखेल येथे विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने परिसरातील विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी ये-जा करतात. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे एस.टी. बससेवाही प्रभावित झाली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर त्याचा परिणाम होत आहे. दरम्यान, संबंधित विभागाने तात्काळ रस्ता दुरुस्ती व डांबरीकरणाची कामे पूर्ण न केल्यास गुरुवार दि. २८ मे रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, मुखेड येथे आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

### दाभड येथे २७ रोजी सामूहिक मंगल परिणय सोहळा

नांदेड/प्रतिनिधी-शांतीदूत प्रतिष्ठाण नांदेडच्या वतीने बुधवार, दि. २७ मे २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता महाविहार बावरीनगर, दाभड नांदेड येथे १७ वा सामूहिक मंगल परिणय सोहळा आयोजित केला असून या सोहळ्यात एकूण १५ जोडपे विवाहबद्ध होणार आहेत.

हा सोहळा भिक्खू अतुरलिय रतन महाथेरो श्रीलंका, भिक्खू प्रा.डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, भिक्खू अश्वजीत थेरो, भिक्खू रेवतबोधी, भिक्खू बुद्धभूषण यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.या सोहळ्यास महाउपासक डॉ. एस.पी. गायकवाड, चेअरमन पी.ई. सोसायटी, बी.एम. कांबळे सेनि. अतिरिक्त जिल्हाधिकारी, आंबेडकरी नेते सुरेश दादा गायकवाड, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, बी.एम. सुकरे, प्रा. आर.बी. मादळे, सहाय्यक समाजकल्याण आयुक्त शिवानंद मिनगीरे, सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक विजय डोंगरे, मारोतराव थोरात, भारतीय बौद्ध महासभा (उत्तर नांदेड) जिल्हाध्यक्ष गणपत गायकवाड, तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांची उपस्थिती लाभणार आहे.

### माधव अदमाने यांची लिपीकपदी निवड

नांदेड/प्रतिनिधी-शहरालगत असलेले वाघी येथील रहिवासी माधव तुकाराम अदमाने यांचे पुणे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडमध्ये लिपिकपदी निवड झाली आहे.

या निवडीबद्दल प्रीतपालसिंघ शाहू, अ‍ॅड.अजय हनुमंते, संतोष पाटील भोसले, अमर हनुमंते, राजाराम कराळे, सुरेश बादशाह, दिलीप राठोड, संजय शेळगे, हेमंत वागरे, अर्पणा कुलकर्णी, फैयाज सय्यद, रविकांत डोंगरे, नामदेव मुराळकर, महादेव लाडे, रुपाली वागरे/वैद्य व समस्त गावकरी मंडळी, मित्र परिवार, वाघी यांनी शुभेच्छा देवून त्यांचे अभिनंदन केले आहे.

### नायगाव येथे आ.राजेश पवारांचा २९ रोजी जनता दरबार

नायगाव/प्रतिनिधी-तालुक्यातील नागरिकांच्या विविध शासकीय अडचणी व प्रलंबित कामांचा तात्काळ निपटारा करण्यासाठी आफ्राजेश संभाजी पवार यांच्या पुढाकारातून पुन्हा एकदा जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे.



महसूल, पंचायत समिती, तहसील कार्यालय तसेच विविध शासकीय विभागांशी संबंधित प्रश्न नागरिकांनी थेट मांडल्याने अनेक रखडलेली कामे पूर्ण झाली आहेत. नागरिकांच्या अडचणी समजून घेत तत्काळ संबंधित विभागांना सूचना देऊन प्रश्न सोडवण्यावर आ. राजेश पवार यांचा भर असल्याचे दिसून येत आहे. शुक्रवार दि. २९ मे २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत नायगाव तहसील कार्यालय सभागृह येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील नागरिकांनी आपल्या समस्या, तक्रारी व प्रलंबित शासकीय कामांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. समस्यांचा ऑन द स्पॉट निपटारा हे या जनता दरबाराचे मुख्य वैशिष्ट्य ठरत असून नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होत आहे.

# बाजार समितीच्या ठरावानंतर 'सह्याद्री'चा नवा डाव?

## कोट्यवधींचे कर्ज खाजगी मालमत्तेवर चढविण्याचा घाट;अवसायक गोत्यात येण्याची शक्यता

माहूर/प्रतिनिधी-माहूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या सह्याद्री जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्थेच्या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून, कोट्यवधींचे कर्ज लपवण्यासाठी नवा खेळ सुरू असल्याचा आरोप समोर आला आहे. लीज संपलेल्या बाजार समितीच्या जमिनीवर घेतलेले कर्ज आता खाजगी मालमत्तेवर वळविण्याचा घाट घातला जात असल्याने संपूर्ण व्यवहारावर संशयाचे ढग दाटले आहेत.

या संपूर्ण प्रकारावर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने तीव्र आक्षेप घेत ठराव मंजूर केला असून, सुरुवातीपासूनच संपूर्ण प्रक्रिया नियमबाह्य झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे सह्याद्री जिनिंग प्रेसिंग संस्थेचे अवसायक स्वतःच कायद्याच्या कचाट्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.सन १९९४ मध्ये शेतकऱ्यांच्या हिताचे गोड बोल सांगत बाजार समितीची तब्बल १ हेक्टर २१ आर जमीन सह्याद्री जिनिंग प्रेसिंग संस्थेला केवळ २ हजार रुपये वार्षिक भाड्याने म्हणजे अवघ्या १६५ रुपये महिन्याने तब्बल २८ वर्षांसाठी देण्यात आली होती. विशेष म्हणजे या करारात जमीन कोणालाही गहाण ठेवता येणार नाही किंवा हस्तांतरित करता येणार नाही, अशी स्पष्ट अट होती.मात्र, या अटीला केराची टोपली दाखवत संबंधित जमीन नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत गहाण ठेवून कोट्यवधींचे कर्ज उचलण्यात आल्याचा आरोप आहे. आता तेच कर्ज दुसऱ्या खाजगी मालमत्तेवर चढविण्याची हालचाल सुरू असल्याने संताप व्यक्त होत आहे.धक्कादायक बाब म्हणजे ज्या खाजगी जमिनीवर हा कर्जबोजा टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे, त्या मालमत्तेचे मूल्यच संबंधित कर्जाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याची चर्चा आहे. त्यामुळे हा संपूर्ण व्यवहार आर्थिक नियमांना हरताळ फासणारा असल्याचा आरोप होत आहे. मुळात बाजार समितीची जमीन गहाण ठेवणेच बेकायदेशीर होते. आता ती चूक झाकण्यासाठी दुसऱ्या मालमत्तेवर कर्ज वळवण्याचा प्रयत्न म्हणजे एक चोरी लपवण्यासाठी दुसरी चोरीच आहे, असा संतप्त सूर बाजार समितीतील काही संचालकांनी व्यक्त केला.नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत थकबाकीदार संचालकांवरून जिल्हाभरात तब्बल १२९ हरकती दाखल झाल्याने प्रशासनाची कार्यपद्धती आधीच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. अशातच माहूरमधील हे प्रकरण समोर आल्याने सहकार क्षेत्रातील गैरव्यवहार पुन्हा चर्चेत आले आहेत.आता या संपूर्ण व्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी होणार का? नियम धाब्यावर बसवून कर्ज व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई होणार का? आणि बाजार समितीच्या मालमत्तेचा खासगी फायद्यासाठी वापर करणाऱ्यांना संरक्षण कोण देत आहे? असे सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

> कृषी उत्पन्न बाजार समितीची जमीन शेतकऱ्यांच्या हितासाठी होती, काही लोकांच्या खासगी फायद्यासाठी नव्हे. करारातील अटी धाब्यावर बसवून बाजार समितीची मालमत्ता गहाण ठेवणे आणि आता कोट्यवधींचे कर्ज खाजगी मालमत्तेवर वळविण्याचा प्रयत्न करणे हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. नियम मोडणारे कितीही मोठे असले तरी त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. सहकार क्षेत्राला बदनाम करणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही.
>
> **- ज्योतिबा खराटे,** शिवसेना जिल्हाप्रमुख, नांदेड

## मागील चुकांमधून काहीच धडा शिकला नाही का?

### सुप्रीम कोर्टाची एनटीएला फटकार

नवी दिल्ली:नीट पेपरफुटी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने आज (२५ मे) नॅशनल टेस्टिंग एजन्सीची कडक शब्दात कानउघाडणी केली आहे. आपली नाराजी व्यक्त करताना न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, परीक्षा आयोजित करण्याची जबाबदारी असलेल्या या संस्थेने आपल्या मागील चुकांमधून अद्याप कोणताही धडा शिकलेला नाही. शिवाय, परीक्षा पद्धतीत मोठ्या सुधारणांची मागणी करणाऱ्या याचिकांवर आपले म्हणणे मांडण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि एनटीए यांना नोटिसा बजावल्या आहेत.

## भदंत पय्याबोधी यांना शाहू महाराज पुरस्कार जाहीर

नांदेड/प्रतिनिधी-तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे



जिल्हाध्यक्ष धर्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांना छत्रपती शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने भदंत पंय्याबोधी थेरो यांना निवडपत्र देण्यात आले असून नवीन नांदेडातील सिडको येथे दि. २६ जून रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. फुले आंबेडकरी चळवळीसह धम्म चळवळीत अग्रेसर असलेल्या भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना सदरील पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# सुकळी येथे गोरक्षकाची निर्घृणपणे हत्या

उमरखेड/प्रतिनिधी-गोवंश तस्करी रोखणाऱ्या बजरंग दलाच्या एका कट्टर कार्यकर्त्याची गोवंश तस्करांनी अमानुष आणि अत्यंत निघृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना उमरखेड पासून ५ किमी अंतरावरील सुकळी (ज.) येथे शनिवारी मध्यरात्री घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. गजानन मारोती सुरोशे (रा. वडद-मुडाणा, ता. महागाव) असे मृतकाचे नाव असून या प्रकरणी दोन संशीयतांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरून एका बोलेरो पीक-अप वाहनातून (क्र. एमएच २९ बीई ८९१५) गोवंशाची अत्यंत निर्दयीपणे कोंबून कत्तलीसाठी उमरखेडच्या दिशेने तस्करी केली जात असल्याची माहिती बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. त्यानुसार कार्यकर्त्यांनी बिजोरा टोल नाक्यावर सापळा रचून सदर संशयास्पद वाहन अडविण्याचा प्रयत्न केला मात्र कार्यकर्त्यांना हुलकावणी देत तस्करांनी वाहन वेगाने पळविले. गोवंशाची तस्करी होत असल्याचे पाहून गजानन सुरोशे यांनी तातडीने आपल्या एस-क्रॉस कारने (क्र. एम एच १२ पिटी ८६३४) तस्करांच्या वाहनाचा



थरारक पाठलाग सुरू केला. पकडले जाण्याच्या भीतीने तस्करांनी आपली बोलेरो सुकळी गावाच्या दिशेने वळवली.गजानन सुरोशे यांचे वाहन मागोमाग सुकळी गावात शिरताच, आधीच दबा धरून बसलेल्या तस्करासह त्यांच्या साथीदारांनी गजानन यांच्या गाडीला वेढा घातला. काही समजण्याच्या आतच तस्करांच्या टोळीने गजानन यांच्या गाडीवर मोठमोठे दगड आणि लाकडी दांडक्यांनी भीषण हल्ला केला, नराधमांनी गाडीची पूर्ण तोडफोड करून गजानन सुरोशे यांना गाडीबाहेर ओढले आणि दगडाने अमानुषपणे ठेचले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गजाननला ग्रामस्थांनी तात्काळ रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला, मात्र दुर्दैवाने वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. घटनेचे गांभीर्य आणि परिसरातील वाढता तणाव पाहता जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता आणि उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी तात्काळ मोठा फौजफाटा घेऊन घटनास्थळ गाठले. सुकळी आणि महागाव परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून संवेदनशील भागात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### महागाव कडकडीत बंद

बजरंग दलाचे कार्यकर्ते गजानन सुरोशे यांच्या या क्रूर हत्येची बातमी वाऱ्यासारखी पसरताच रविवारी संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली. बजरंग दल आणि इतर हिंदुत्ववादी संघटनांनी या नराधम कृत्याचा निषेध करत 'महागाव बंद'ची हाक दिली. संतप्त कार्यकर्त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानांचे शटर डाऊन ठेवले. मुख्य बाजारपेठेसह सर्व व्यवहार कडकडीत बंद ठेवून गजानन सुरोशे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आणि तस्करांविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. आता पोलिसांच्या पुढील कारवाईकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# अधिक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी माहूरगडावर भाविकांची प्रचंड गर्दी

माहूर/प्रतिनिधी-दर तीन वर्षांनी येणाऱ्या पवित्र अधिक मासानिमित्त साडेतीन शक्तीपीठा-पैकी पूर्ण पीठ असलेल्या माहूरगड येथे दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. अधिक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी राज्याच्या विविध भागांसह तेलंगणा, आंध्रप्रदेश व शेजारील राज्यांतून हजारो भाविक माहूरमध्ये दाखल झाले.

शनिवार-रविवार सुट्टीचा योग साधत अनेक कुटुंबांनी माहूर यात्रेचा बेत आखला असून पहाटेपासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. श्री रेणुका माते की जयच्या जयघोषाने संपूर्ण माहूर परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला होता. अधिक मास हा हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानला जातो. या महिन्याला पुरुषोत्तम महिना किंवा धोंड्याचा महिना असेही संबोधले जाते. या काळात देवी-देवतांच्या दर्शनाला, जप-तप, दानधर्म आणि धार्मिक विधींना विशेष महत्त्व असल्याने भाविक मोठ्या श्रद्धेने माहूरगडावर येत आहेत. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता मंदिर प्रशासनाणे पिण्याचे पाणी, स्वच्छता, आणि दर्शन रांग व्यवस्थापनावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. भाविकांना





कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. माहूरगडावरील धार्मिक उत्साहामुळे मंदीच्या काळात स्थानिक व्यापारी, फुलविक्रेते, प्रसाद विक्रेते आणि लहान व्यावसायिकांमध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विधानपरिषद जागांवरुन महायुतीत तिढा


## मार्ग निघेल,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा विश्वास

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील जागावाटपावरून अद्यापही चर्चा सुरू असून काही मतदारसंघांबाबत तिढा कायम असल्याचे चित्र आहे. नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या विधानपरिषद मतदारसंघांवरून मित्रपक्षांमध्ये चर्चा सुरू असून लवकरच मार्ग निघेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबई येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिवसेनेसोबत नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागांबाबत चर्चा सुरू आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेससोबत पुणे मतदारसंघाबाबत वाटाघाटी सुरू आहेत. अजून अंतिम निर्णय झालेला नसला तरी तिन्ही जागांवर सकारात्मक तोडगा निघेल, असा मला विश्वास आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.आंबेनळी घाटातील दुर्घटनेबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, घाट परिसरात आतापर्यंत तीन मृतदेह आढळून आले असून शोधमोहीम सुरूच आहे. सुरुवातीला या घटनेची माहिती कुणालाही नव्हती. काही नागरिक बेपत्ता असल्याचे समोर आल्यानंतर शोधकार्य सुरू करण्यात आले आणि त्यातून ही दुर्घटना उघडकीस आली. या प्रकरणी पुढील तपास आणि आवश्यक कारवाई सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी कठोर भूमिका घेतली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी मोठा अन्याय केला आहे. केंद्र सरकार आणि तपास यंत्रणांनी या प्रकरणाची मुळापर्यंत चौकशी करत संबंधितांना अटक केली आहे. पुढील नीट परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि काटेकोर पद्धतीने पार पडेल, असे त्यांनी म्हटले.

# संघ स्वयंसेवक गोविंद गुट्टे यांचे निधन

किनवट/प्रतिनिधी-बोधडी बु. येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक गोविंद शहाजीराव गुट्टे यांचे दिल्ली येथील रेल्वे स्थानकावर परतीच्या प्रवासादरम्यान २४ मे रोजी रात्री ११ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला असून बोधडी बु.च्या पंचक्रोशीतून हळहळ व्यक्त केली जात आहे. जनजाती सांस्कृतिक समागम कार्यक्रमासाठी



दिल्ली येथे गेले होते.दिल्ली येथील २४ मे रोजीच्या जनजाती संस्कार समागम गर्जना रॅलीसाठी गोविंद गुट्टे हे गेले होते. दिवसभराचे कार्यक्रम आटोपून परतीचा प्रवासासाठी दिल्लीच्या रेल्वे स्थानकावर आले होते. दरम्यान रात्री ११ वाजताचे आसपास त्यांना हृदयविकाराचा झटका येऊन अकस्मित दुर्दैवी निधन झाल्याचे समजते.स्व.गुट्टे हे बोधडी येथील होणाऱ्या हरिनाम सप्ताह, भागवत सप्ताह अशा धार्मिक कार्यात त्यांचे मोलाचे योगदान असायचे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वेगवेगळ्या आयामामध्येही त्यांचे योगदान असायचे. बोधडी पंचक्रोशीतील एक निष्ठावान निस्वार्थ सेवा देणारे वारकरी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या आकस्मित जाण्याने बोधडी पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायात पोकळी निर्माण झाल्याच्या अनेकांच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत.







पान १ वरुन

### खोल दरीत वाहन...

आणि परिसर अंधारमय असल्याने बचावकार्यात मोठ्या अडचणी येत आहेत. प्रशासनाने प्रत्येकी सात जणांची पाच पथके तयार करून मृतदेह बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. आतापर्यंत तीन मृतदेह बाहेर काढण्यात आले असून उर्वरित मृतदेह शोधण्याचे काम सुरू आहे.दरम्यान, अपघातग्रस्त स्कॉर्पिओचा पहिला फोटो समोर आला असून वाहनाचा पूर्णपणे चक्काचूर झालेला दिसत आहे. गाडीपासून काही फुटांवर मृतदेह आढळल्याने अपघाताची भीषणता स्पष्ट झाली आहे.या अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये सातारा जिल्ह्यातील सात तरुणांचा समावेश असून एक जण रत्नागिरी जिल्ह्यातील असल्याची माहिती प्रशासनाने दिली. मृतांची नावे रितेश राजेंद्र लोखंडे (२५), महेश अनिल पवार (२५), आदित्य अशोक साळुंखे (२१), सुहास जितेंद्र लोखंडे (२०), अंश समीर चव्हाण (१८), उत्कर्ष आनंद शिंगटे (२१), अनिल अभिमन्यू शिंगटे (२५), नितीन किसन नायकोंडे (३५).

### हँडग्रेनेडचा हातातच स्फोट;...

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. जखमी जवानांना त्वरित जवळील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.दरम्यान, हा स्फोट स्मोक हँडग्रेनेड फुटल्यामुळे झाल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### कोसमेट जवळ १७ लाख रुपयांचा...

शासनाने प्रतिबंधीत केलेल्या विविध कंपनीचा १७ लाख रुपये किंमतीचा गुटख्याचा साठा आढळून आला. पोलीसांनी गुटखा व बोलेरो वाहन असा २७ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. गुटख्या संदर्भात पोलीसांनी वाहनचालकाकडे चौकशी केली असता सदरील गुटखा हा हिमायतनगर येथील सय्यद आमेर स. खमर रा.रहिम कॉलणी, हिमायतनगर यांचा असून निर्मल (तेलंगणा) येथील शेख मजहर यांच्याकडून खरेदी करुन हिमायतनगरला घेवून जात असल्याचे सांगितले. फौजदार नागनाथ तुकडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुटखा किंग सय्यद आमेर, वाहन चालक सय्यद मोहम्मद अली व शेख मजहर यांच्या विरुध्द इस्लापूर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मध्यप्रदेशातील डिंक माफियांचा...

केलेली आहे. कालांतराने धावन्डा झाडे इतिहास जमा होतील. भविष्यातील ही धोक्याची घंटा लक्षात घेऊन यापुढे असे प्रकार थांबवायचे असतील तर अशा लोकांच्या एफडीसीएम आणि प्रादेशिक वनविभाग प्रशासनाने वनगुन्ह्याच्या कायद्यान्वये मुसक्या आवळणे काळाची गरज असल्याचे पर्यावरण प्रेमींचे म्हणणे आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४